माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १८५१/२०२१**

**अपिलार्थी, श्री. जागेश्वर शामराव कुंभरे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
ग्रामपंचायत उमरी/लवारी, ता. साकोली, जि.भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती साकोली, ता. साकोली जि.भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०८.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०६.२०२१ | २०.०७.२०२१ | २६.०७.२०२१ | ०४.०८.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २८.०६.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) २०२० पर्यंत किती कुंटुबाचे घर कर व पाणी पट्टी कर भरलेला आहे. त्यांची नावे व त्या समोर त्याची रक्कम आणि ज्यांच्या कडे घर कर व पाणी पट्टी कर बाकी असणाऱ्याची नावे व त्या समोर त्यांची रक्कम याची माहिती द्यावी २) नविन ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी मंजूर झालेली एकूण रक्कम (निधी) किती त्याची प्रत हवी व इमारत बांधकामासाठी खर्चाच्या बिलांची प्रत देण्यात यावी. ३) जूनी ग्रामपंचायत ही स्लॉप लेव्हल पर्यंत पाडण्यात आली होती त्या ठरावाची प्रत देण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत आपल्याला पाहता येईल व अवलोकन करता येईल व त्यानंतर आपल्याला पाहिजे असलेल्या सत्यप्रती देता येईल. तरी आपण दि. २७.०७.२०२१ च्या अर्जात मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पाहून व अवलोकन करुन पाहिजे असलेल्या सत्यप्रतीची मागणी करावी, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २६.०७.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “ माहिती देण्यात आली नाही ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४.०८.२०२१ रोजीच्या

पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उमरी यांना दिनांक १४.०७.२०२१ ला अर्ज सादर केल्याचे जोडपत्रामध्ये दिसून येत आहे. आपण मुदतीपूर्वीच अपिल अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अपील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. तरी ३० (तीस) दिवसानंतर अपील अर्ज दाखल करावे. अपील अर्ज परत करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ३१.०८.२०२१ रोजी** " मागितलेली माहिती देण्यात आली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०३.०९.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आयोगातर्फे दिनांक २६.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु त्यावेळी सुनावणीची कार्यवाही पुर्ण होऊ न शकल्याने सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २१.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, श्री. डि एस. खुजे व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, कु. पी.जे. साखरे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री. एन.टी. मेळे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक २८.०६.२०२१ व दिनांक १३.०७.२०२१ रोजीचा माहिती अर्ज प्राप्त होताच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.०७.२०२१ रोजी अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने ग्रामपंचायतीतील अभिलेखाचे अवलोकन करुन अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलार्थीस सुचीत केले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक २६.०७.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केलेला असून त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उमरी यांना दिनांक १४.०७.२०२१ ला अर्ज सादर केल्याचे जोडपत्रामध्ये दिसून येत आहे. आपण मुदतीपूर्वीच अपिल अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अपील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. तरी ३० (तीस) दिवसानंतर अपील अर्ज दाखल करावे. अपील अर्ज परत करण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी आयोगासमोर व्दितीय अपील दाखल केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार माहिती अवलोकनाची कोणतीही विनंती जन माहिती अधिकारी यांचेकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी कलम ७(१) चा भंग झालेला असून उपलब्ध असलेली माहिती तात्काळ प्रदान करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, मागितलेली माहिती महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, दि.१६.०१.२०१२ च्या अधिसुचनेप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम-२००५ यांच्या नियम-३(क) नुसार नसून यात ३ वेगवेगळया विषयाची माहिती मागितलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ संदर्भात विहीत मुदतीत यापूर्वीच प्रतिसाद दिलेला असून अपिलार्थी यांना वरील माहिती प्राप्त करुन घेण्यास स्वारस्य असल्यास दिनांक २०.०७.२०२१ रोजी दिलेल्या प्रतिसादाच्या अनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी

यांचेशी संपर्क व समन्वय साधून मुद्दा क्र. १ ची संबंधित माहितीचे अवलोकन करुन अपेक्षित असलेली ५० पृष्ठांची माहिती विनामुल्य प्राप्त करुन घ्यावी. उर्वरित माहिती शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावी. तसेच वरील माहिती ही सॉप्ट कॉपी स्वरुपात उपलब्ध असल्यास संपूर्ण माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी. तसेच मुद्दा क्र. २ व ३ संदर्भात महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, दि.१६.०१.२०१२ च्या अधिसुचनेप्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम-२००५ यांच्या नियम-३(क) नुसार अपिलार्थी यांनी स्वतंत्रपणे अर्ज सादर केल्यास त्यावर तात्काळ प्रतिसाद देण्याच्या सुचनेसह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २१.०८.२०२३**

जावक क्रमांक ६०४९ दिनांक 27 OCT 2023